लोकमत

रॉब अँडरसन यांची ग्वाही : 'स्मॅक'मध्ये परिसंवाद

# कोल्हापूरचे उत्पादन जागतिक नकाशावर आणण्यास सहकार्य

**शिरोली** : कोल्हापूरच्या उद्योगांची ताकद मोठी आहे, येथील उत्पादन जागतिक नकाशावर आणण्यासाठी सर्वतोपरी साहाय्य करू, असे आश्वासन अमेरिकेच्या वाणिज्य दूतावासाचे आंतरराष्ट्रीय जनसंपर्क अधिकारी रॉब अँडरसन यांनी दिले. स्मॅक भवनमध्ये बुधवारी आयोजित 'क्लीन टेक्नॉलॉजीस अ‍ॅण्ड एनर्जी एफिशियन्सी सिस्टम्स' या विषयावर आयोजित परिसंवादात ते बोलत होते.

कार्यक्रमाला महानगरपालिका आयुक्त कादंबरी बलकवडे प्रमुख म्हणून उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी स्मॅकचे अध्यक्ष दीपक पाटील होते. अँडरसन म्हणाले, अमेरिकेमधील गुंतवणूकदार तुमच्याकडे असलेल्या पर्यावरण धोरणामुळे जात आहेत, अमेरिकेतील काम मिळवण्यासाठी येथील उद्योगांना प्रदूषण उत्सर्जन कमी करावे लागेल. जिथे भारत अजूनही स्पर्धात्मक आहे आणि कदाचित पुढे झेप घेऊ शकेल. येथील विद्यापीठांमध्ये मनुष्यबळ, कौशल्य, पर्यावरण शिक्षण देण्यात येते. भारतातील विद्यापीठांमध्ये होत असलेल्या अभियांत्रिकी शिक्षणाने चीनला मागे टाकले असून, सर्वाधिक विद्यार्थी अमेरिकेमध्ये आहेत. गेल्यावर्षी आम्ही अमेरिकन दूतावासामधून संपूर्ण भारतात २० हजार व्हिसा दिले असल्याचे अँडरसन यांनी सांगितले. कोल्हापुरातील कृषी घटक अर्थव्यवस्थेला चालना देत असल्याने देशातील दरडोई उत्पन्नात कोल्हापूर अव्वल स्थानावर असल्याचे अँडरसन म्हणाले. कार्यक्रमास वर्ल्ड ट्रेड सेंटरचे अनिल वेल्दे, जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक सतीश शेळके, स्मॅकचे उपाध्यक्ष एम.वाय. पाटील, खजानीस जयदीप चौगले, आयटीआय चेअरमन राजू पाटील, स्मॅक फाउंड्री क्लस्टर अध्यक्ष नीरज झंवर, संचालक अमर जाधव, अतुल पाटील, सचिन पाटील, भरत जाधव, प्रशांत शेळके, जयदत्त जोशीलकर, सीआयएफ पश्चिम विभागाचे अध्यक्ष रवी डोली, गीअर मास्टरचे शरद पाटील, नामदेव पाटील, बदाम पाटील, हेमांग सोमय्या, विशाल मंडलिक उपस्थित होते.



**स्मॅकमधील कार्यक्रमात अमेरिकेचे जनसंपर्क अधिकारी रॉब अँडरसन यांनी मार्गदर्शन केले. यावेळी उद्योजक अमर जाधव, एम.वाय. पाटील, दीपक पाटील, कादंबरी बलकवडे, अनिल वेल्दे, सतीश शेळके आदींची उपस्थिती होती.**

## कोल्हापूरचा पाहुणचार चांगला

पाहुणचारासाठी कोल्हापूर ओळखले जाते आणि हे मी अनुभवले आहे, येथे येण्यापूर्वी मी सुरतला भेट दिली. त्यापेक्षा कोल्हापूरचा पाहुणचार चांगला होता. या शब्दांत अँडरसन यांनी कोल्हापूरकरांचे कौतुक केले.

Kolhapur Main
Page No. 4 Feb 23, 2023
Powered by: erelego.com

दैनिक जनसामान्यांचा लोकनेता

# भारतातील विद्यापीठातील अभियांत्रिकी शिक्षणाने चीनला मागे टाकले : रॉब ऍंडरसन

टोप/प्रतिनिधी–

शिरोली एमआयडीसी (ता.हातकणंगले) येथील शिरोली मॅन्युफॅक्चर्स असोसिएशन कोल्हापूर व वर्ल्ड ट्रेड सेंटर मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने क्लीन टेक्नॉलॉजी अँड एनर्जी एपीसीएनसी सिस्टीम्स या विषयावरती परिसंवाद पार पडला. परिसंवादात अमेरिकन कॉन्सिलेट जनरलचे आंतरराष्ट्रीय जनसंपर्क अधिकारी रॉब एडेरसन यांनी विशेष मार्गदर्शन केले.




यावेळी कोल्हापूर महानगरपालिका प्रशासक डॉ.कादंबरी बलकवडे, वर्ल्ड ट्रेड सेंटरचे अनिल वेल, दे डी आय सी चे महाव्यवस्थापक सतीश शेळके, अमृता डिमेलो स्मॅक चेअरमन दीपक पाटील, उपाध्यक्ष एम.वाय. पाटील व इतर मान्यवर उपस्थित

।पान २ वर ▶

# भारतातील विद्यापीठातील अभियांत्रिकी शिक्षणाने चीनला मागे टाकले : रॉब ऍंडरसन

होते. कार्यक्रमात प्रथम शिरोली मॅन्युफॅक्चर्स असोसिएशनचे अध्यक्ष, उपाध्यक्ष यांच्याहस्ते प्रमुख पाहुण्यांचा सत्कार करण्यात आला. चेअरमन दीपक पाटील यांनी परिसंवाद आयोजनामागील उद्देश तसेच राबविण्यात येणाऱ्या विविध प्रकल्पांची माहिती दिली. कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक रॉब ऍंडरसन यांनी सांगितले की, भारतीय विद्यापीठात मनुष्यबळ कौशल्य पर्यावरण इत्यादी शिक्षण देण्यात येते. भारतातील विद्यापीठांमध्ये होत असलेल्या अभियांत्रिकी शिक्षणाने चायनाला सुद्धा मागे टाकले असून सर्वाधिक भारतीय विद्यार्थी अमेरिकेमध्ये आहेत. मागील वर्षी आम्ही अमेरिकन दूतावासामधून संपूर्ण भारतामध्ये २० हजार विसा देऊ केले आहेत तसेच त्यात आणखीन वाढ होत आहे. शिरोली मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन ला उत्पादनाच्या जागतिक नकाशावर आणण्यासाठी सर्वतोपरी सहाय्य केले जाईल, असे त्यांनी सांगितले.

डॉ.कादंबरी बलकवडे यांनी पर्यावरण या विषयावरती आपले विचार मांडले. डी आय सी चे महाव्यवस्थापक सतीश शेळके यांनी कोल्हापूरच्या उद्योगाचा परिचय व ताकद विशद केली. एस इ पी चे अमर जाधव यांनी औद्योगिक उत्पादन निर्यात स्मॅक एक्सपोर्ट प्रमोशन प्रकल्प इत्यादी विषयी माहिती सांगितली. शिरोली मॅन्युफॅक्चर्स असो संचालक सचिन पाटील यांनी सेंड रिक्लेमेशन प्लांट याविषयी माहिती सांगितली तर वीरेंद्र पाटील यांनी फाउंड्री उद्योगासमोरील आव्हाने या विषयावर माहिती सांगितली.

कार्यक्रमास शिरोली मॅन्युफॅक्चर्स असोसिएशन उपाध्यक्ष एम.वाय.पाटील, खजिनदार जयदीप चौगुले, आयटीआई चेअरमन राजीव पाटील, नीरज जंवर, अतुल पाटील, भरत जाधव, प्रशांत शेळके, जयदत्त जोशीलकर, रवी डोली, नामदेव पाटील, अविनाश चिटणीस, प्रवीण पाटील, शेखर कुसाळे, बदाम पाटील, भीमराव पाटील, राजेंद्र चौगुले व उद्योजक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन हेमांग सौमया यांनी केले. तर आभार विशाल मंडलिक यांनी मानले.

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
पुढारी
www.pudhari.com

# कोल्हापूरची उत्पादने जागतिक नकाशावर आणण्यासाठी सहकार्य

## अमेरिकेच्या वाणिज्य दूतावासाचे अधिकारी रॉब अँडरसन यांचे प्रतिपादन

**शिरोली एमआयडीसी : पुढारी वृत्तसेवा**

कोल्हापूर येथील उत्पादनांना जागतिक नकाशावर आणण्यासाठी सर्वतोपरी सहकार्य केले जाईल, असे प्रतिपादन अमेरिकेच्या वाणिज्य दूतावासाचे आंतरराष्ट्रीय जनसंपर्क अधिकारी रॉब अँडरसन यांनी केले.

ते शिरोली मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन कोल्हापूर, स्मॅक व वर्ल्ड ट्रेड सेंटर मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवारी स्मॅक भवन शिरोली येथे आयोजित क्लीन टेक्नॉलॉजीस अॅण्ड एनर्जी एफिशियन्सी सिस्टिम्स (स्वच्छ तंत्रज्ञान आणि ऊर्जा कार्यक्षमता प्रणाली या विषयावर बोलत होते.

पाहुणचारासाठी कोल्हापूर ओळखले जाते आणि हे मी अनुभवले आहे. येथे येण्यापूर्वी मी सुरतला भेट दिली, त्यापेक्षा कोल्हापूरचा पाहुणचार चांगला होता, असेही ते म्हणाले.



स्मॅकचे अध्यक्ष दीपक पाटील यांनी स्वागत केले. त्यांनी परिसंवाद आयोजनामागील उद्देश व स्मॅकच्या वतीने राबवण्यात येणाऱ्या विविध प्रकल्पांची माहिती दिली.

स्मॅकच्या अध्यक्ष व उपाध्यक्षांच्या हस्ते प्रमुख पाहुण्यांना स्मृतिचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

कोल्हापूर महानगरपालिकेच्या आयुक्त डॉ. कादंबरी बलकवडे, जिल्हा उद्योग केंद्रचे महाव्यवस्थापक सतीश शेळके, वर्ल्ड ट्रेड सेंटरचे प्रमुख अनिल वेल्दे, दूतावासाच्या सार्वजनिक सहभाग विशेषज्ञ अमृता डिमेल्लो यांची प्रमुख उपस्थित होती.

डॉ. कादंबरी बलकवडे यांनी पर्यावरणाचे आणि कोल्हापूर शहर म्हणून सामायिक महत्त्वत्त याबद्दल विचार व्यक्त केले. जिल्हा उद्योग केंद्र, कोल्हापूरचे महाव्यवस्थापक सतीश शेळके, वर्ल्ड ट्रेड सेंटरचे अनिल वेलदे तसेच अमर जाधव, सचिन पाटील, वीरेंद्र पाटील यांनी मनोगत व्यक्त केले.

सूत्रसंचालन व प्रमुख पाहुण्यांची ओळख एसईपी सदस्य हेमांग सोमय्या यांनी केले, तर आभार प्रदर्शन विशाल मंडलिक यांनी मानले. कार्यक्रमास स्मॅकचे उपाध्यक्ष एम. वाय. पाटील, जयदीप चौगले, राजू पाटील, नीरज झंवर, अतुल पाटील, भरत जाधव, प्रशांत शेळके, जयदत्त जोशीलकर, रवी डोली आदी उपस्थित होते.

पुण्य नगरी

# कोल्हापूरची उत्पादने जागतिक नकाशावर आणणार

## रॉब अँडरसन : फौंड्रीमधील ऊर्जा कार्यक्षमतेचे तंत्रज्ञान हस्तांतरणास मदतीचे आश्वासन




**शिये : प्रतिनिधी**

कोल्हापूर येथील उत्पादनांना जागतिक नकाशावर आणण्यासाठी सर्वतोपरी साहाय्य केले जाईल, असे प्रतिपादन अमेरिकेच्या वाणिज्य दूतावासाचे आंतरराष्ट्रीय जनसंपर्क अधिकारी रॉब अँडरसन यांनी केले. ते शिरोली मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन कोल्हापूर, स्मॅक व वर्ल्ड ट्रेड सेंटर मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवारी स्मॅक भवन, शिरोली येथे आयोजित क्लीन टेक्नॉलॉजीस अ‍ॅण्ड एनर्जी एफिशियन्सी सिस्टीम्स (स्वच्छ तंत्रज्ञान आणि ऊर्जा कार्यक्षमता प्रणाली) या विषयावर बोलत होते.

यावेळी स्मॅकचे अध्यक्ष दीपक पाटील यांनी उपस्थितांचे स्वागत केले. त्यांनी परिसंवाद आयोजनामागील उद्देश व स्मॅकच्या वतीने राबवण्यात येणाऱ्या विविध प्रकल्पांची माहिती दिली.

कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक अमेरिकेच्या वाणिज्य दूतावासाचे आंतरराष्ट्रीय जनसंपर्क अधिकारी रॉब अँडरसन यांनी दूतावासाकडून एक्स्चेंज प्रोग्रामअंतर्गत मदत करण्याची ग्वाही दिली. तसेच फौंड्रीमधील ऊर्जा कार्यक्षमतेचे तंत्रज्ञान हस्तांतरणास मदत केली जाईल, असे सांगितले.

यावेळी महापालिकेच्या आयुक्त तथा प्रशासक डॉ. कादंबरी बलकवडे, जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक सतीश शेळके, वर्ल्ड ट्रेड सेंटरचे प्रमुख अनिल वेलदे, अमृता डिमेल्लो तसेच अमर जाधव, सचिन पाटील, वीरेंद्र पाटील, स्मॅकचे उपाध्यक्ष एम. वाय. पाटील, खजानीस जयदीप चौगले, आयटीआय चेअरमन राजू पाटील, स्मॅक फौंड्री क्लस्टर संचालक नीरज झंवर, अतुल पाटील, भरत जाधव, प्रशांत शेळके, जयदत्त जोशीलकर आदी उपस्थित होते.

रॉब अँडरसन यांनी औद्योगिक क्षेत्रातील उद्योगांना भेट दिली. यावेळी त्यांना कोल्हापूरच्या उद्योगांची ताकद व पायाभूत सुविधांची माहिती देण्यात आली.

सकाळ

# कोल्हापूरचे उत्पादन जागतिक नकाशावर यावे : रॉब अँडरसन

## अमेरिकेच्या वतीने सहकार्य करण्याचे आश्वासन : स्मॅक,वर्ल्ड ट्रेड सेंटरच्या वतीने परिसंवादाचे आयोजन

सकाळ वृत्तसेवा

नागाव, ता. २२ : कोल्हापूरच्या उत्पादनाला जागतिक नकाशावर आणण्यासाठी सर्वतोपरी सहकार्य करणार असल्याचे अमेरिकेच्या वाणिज्य दूतावासाचे आंतरराष्ट्रीय जनसंपर्क अधिकारी रॉब अँडरसन यांनी सांगितले. शिरोली मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन (स्मॅक) व वर्ल्ड ट्रेड सेंटर, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'स्वच्छ तंत्रज्ञान आणि ऊर्जा कार्यक्षमता प्रणाली' या विषयावरील परिसंवादात ते बोलत होते.




**शिरोली : 'स्मॅक' येथे आयोजित कार्यक्रमात बोलताना रॉब अँडरसन. शेजारी अमर जाधव, एम. वाय. पाटील, दीपक पाटील, डॉ. कादंबरी बलकवडे, सतीश शेळके व अनिल वेलदे.**

'स्मॅक'चे अध्यक्ष दीपक पाटील अध्यक्षस्थानी होते. महापालिकेच्या प्रशासक डॉ. कादंबरी बलकवडे, वर्ल्ड ट्रेड सेंटरचे अनिल वेलदे, जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक सतीश शेळके, अमेरिकन दूतावासाच्या सार्वजनिक सहभाग विशेषज्ञ अमृता डिमेल्लो हे या वेळी प्रमुख उपस्थित होते.

### कृषी घटकांकडून अर्थव्यवस्थेला चालना

▪ 'पाहुणचारासाठी कोल्हापूर ओळखले जाते आणि हे मी अनुभवले आहे. कोल्हापूरचा पाहुणचार चांगला होता. कोल्हापुरातील कृषी घटक अर्थव्यवस्थेला चालना देत आहेत. त्यामुळे 'जीडीपी'मध्ये देशातील शहरांमध्ये कोल्हापूर अव्वलस्थानी आहे', असे अँडरसन यांनी स्पष्ट केले.

अँडरसन यांनी, अमेरिकन दूतावासाकडून एक्स्चेंज प्रोग्राम अंतर्गत मदत करण्याची ग्वाही दिली. तसेच, फाउंड्रीमधील ऊर्जा कार्यक्षमतेचे तंत्रज्ञान हस्तांतरणास मदत केली जाईल, असे सांगितले. ते म्हणाले, की अमेरिकेतील गुंतवणूकदार पर्यावरण धोरणासाठी गुंतवणूक करीत आहेत. त्यांच्याकडून काम मिळविण्यासाठी येथील उद्योगांना उत्सर्जन कमी करावे लागेल. यात भारत अजूनही स्पर्धात्मक आहे. पण, पुढे झेप घेऊ शकेल. भारतीय विद्यापीठांमध्ये मनुष्यबळ कौशल्य व पर्यावरण शिक्षण देण्यात येते. भारतातील अभियांत्रिकी शिक्षणाने चीनला मागे टाकले असून, सर्वाधिक भारतीय विद्यार्थी अमेरिकेत आहेत. गेल्या वर्षी अमेरिकन दूतावासामधून २० हजार भारतीयांना व्हिसा दिला आहे.

दरम्यान, अँडरसन यांनी मंगळवार (ता. २१) महालक्ष्मी मंदिराला भेट दिली. तसेच, कणेरी मठ येथील सुमंगलम पंचमहाभूत लोकोत्सवालाही भेट दिली. या वेळी डॉ. कादंबरी बलकवडे, अनिल वेल्दे, सतीश शेळके, अमर जाधव, सचिन पाटील, वीरेंद्र पाटील, रवींद्र सणगर यांनीही मार्गदर्शन केले. या वेळी 'स्मॅक'चे उपाध्यक्ष एम. वाय. पाटील, स्किल ट्रेड प्रमोशन समितीचे अमर जाधव, खजानीस जयदीप चौगले, 'आयटीआय'चे अध्यक्ष राजू पाटील, ज्येष्ठ उद्योजक नरेंद्र झंवर, स्मॅक फाउंड्री क्लस्टरचे अध्यक्ष नीरज झंवर, अतुल पाटील, भरत जाधव, प्रशांत शेळके, जयदत्त जोशीलकर, सीआयएफ पश्चिम विभागाचे अध्यक्ष रवी डोली, उद्योजक नामदेव पाटील, अविनाश चिकणीस, भीमराव खाडे, प्रवीण पाटील, शेखर कुसाळे, बदाम पाटील, संजय भगत आदी उपस्थित होते.

# तरुण भारत



# अमेरिका दूतावासाकडून फौंड्री उद्योगास मदत

## आंतरराष्ट्रीय जनसंपर्क अधिकारी रॉब अँडरसन यांचे आश्वासन : फौंड्रीमधील ऊर्जा कार्यक्षमतेचे तंत्रज्ञान हस्तांतरण होणार : उद्योजकांची उपस्थिती

वार्ताहर
पुलाची शिरोली

अमेरिकेच्या दूतावासाकडून एक्सचेंज प्रोग्राम अंतर्गत मदत करण्याची तसेच फौंन्ड्रीमधील ऊर्जा कार्यक्षमतेचे तंत्रज्ञान हस्तांतरणास मदत केली जाईल, असे आश्वासन अमेरिकेच्या वाणिज्य दूतावासाचे आंतरराष्ट्रीय जनसंपर्क अधिकारी रॉब अँडरसन यांनी कोल्हापूरच्या उद्योजकांना दिले आहे.

शिरोली मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन कोल्हापूर (स्मॅक), वर्ल्ड ट्रेड सेंटर मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवारी स्मॅकभवन येथे आयोजित क्लीन टेक्नॉलॉजीस अँण्ड एनर्जी एफिशियन्सी सिस्टिम्स, स्वच्छ तंत्रज्ञान आणि ऊर्जा कार्यक्षमता प्रणाली या विषयावरील परिसंवादात बोलत होते. स्मॅकचे अध्यक्ष दीपक पाटील अध्यक्षस्थानी होते. तर महापालिका आयुक्त तथा प्रशासक डॉ. कादंबरी बलकवडे, जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक सतीश शेळके, वर्ल्ड ट्रेड सेंटरचे प्रमुख अनिल वेल्दे, दुतावासाच्या सार्वजनिक सहभाग विशेषज्ञ अमृता डिमेल्लो यांची प्रमुख उपस्थित होती.



कोल्हापूर : स्मॅकच्या वतीने आयोजित परिसंवादात मार्गदर्शन करताना रॉब अँडरसन, प्रसंगी दीपक पाटील, कादंबरी बलकवडे, सतीश शेळके, अमृता डिमेल्लो, एम. वाय. पाटील, अमर जाधव आदी.

ते म्हणाले, भारतातील विद्यापीठांमध्ये होत असलेल्या अभियांत्रिकी शिक्षणाने चायनाला मागे टाकले. सर्वाधिक विद्यार्थी अमेरिकेमध्ये आहेत. गेल्या वर्षी आम्ही अमेरिकन दूतावासामधून संपूर्ण भारता मधून २०,००० विजा दिले. स्मॅकला उत्पादनाच्या जागतिक नकाशावर आणण्यासाठी सर्वतोपरी सहाय्य केले जाईल, असे अँडरसन यांनी आश्वासन दिले.

स्कील ट्रेड प्रमोशनचे अमर जाधव म्हणाले, कोल्हापुरातील औद्योगिक उत्पादनाची निर्यात वाढावी, यासाठी वर्ल्ड ट्रेड सेंटर आणि जिल्हा उद्योग केंद्राच्या सहकार्यातून विशेष प्रयत्न सुरू आहेत. आणखी चार देशांच्या वाणिज्य दूतावासाच्या प्रतिनिधींना कोल्हापुरात बोलावणार आहे, असे जाधव यांनी सांगितले.

जिल्हा उद्योग केंद्र, कोल्हापूरचे महाव्यवस्थापक सतीश शेळके यांनी कोल्हापूरच्या उद्योगाचा परिचय आणि ताकद विषद केली. वर्ल्ड ट्रेड सेंटरचे अनिल वेल्दे यांनी कोल्हापूरच्या उद्योजकांना व्यापारात चांगली मदत होईल असा विश्वास व्यक्त केला. स्मॅक अध्यक्ष दिपक पाटील व उपाध्यक्ष एम. वाय. पाटील यांच्या हस्ते प्रमुख पाहुण्यांना स्मृतीचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. स्मॅकचे संचालक सचिन पाटील यांनी स्मॅक संचालित सॅण्ड रेक्लेमेशन प्लांटच्या यशोगाथा तसेच वाळू उपशाचे महत्व आणि अंमलबजावणीची माहिती दिली.

फौंन्ड्री उद्योगावरील आव्हाने या विषयावर वीरेंद्र पाटील यांनी माहिती दिली. सूत्रसंचालन व प्रमुख पाहुण्यांची ओळख हेमांग सोमय्या यांनी केले, तर आभार विशाल मंडलिक यांनी मानले आहे.

कार्यक्रमास स्मॅकचे उपाध्यक्ष एम. वाय. पाटील, खाजनिस जयदीप चौगले, आयटीआय चेअरमन राजू पाटील, फौंन्ड्री क्लस्टर संचालक नीरज झंवर, अतुल पाटील, भरत जाधव, प्रशांत शेळके, जयदत्त जोशीलकर, सीआयएफचे अध्यक्ष रवी डोली, निमंत्रित सदस्य नामदेव पाटील, अविनाश चिकणीस, प्रवीण पाटील, शेखर कुसाळे, बदाम पाटील, भीमराव खाडे, राजेंद्र चौगुले व उद्योजक उपस्थित होते.

### पंचमहाभूत लोकोत्सव आणि अंबाबाईचे दर्शन अविस्मरणीय!

अँडरसन यांनी अंबाबाई मंदिराला भेट देऊन दर्शन घेतले आणि एक छान अनुभव मिळाला. तसेच सुमंगलम पंचमहाभूत लोकोत्सवाला भेट दिली. हा उपक्रम जगात भारी असल्याचे सांगितले.